**सरकार तर्फे साक्षीदार क्रं. ०१,**

**नांव – शेख करीमुन्नीसा अखलाक हुसेन,**

**वय – ४४ वर्षे, कामधंदा – शिक्षक,**

**रा. – चर्च रोड, उदगीर**

**साक्षीदार क्र. ०१ यांच्या शपथेवर सरतपास सरकारतर्फे अधिवक्ता श्री.ए.एस. कदम यांचेद्वारे शपथेवर सुरुः–**

दिनांक ०६ नोव्हेंबर २०२३ मध्ये ती घटना जमहूर हायस्कुल मध्ये झाली. दुपारी १.०० नंतर घडली. मी शाळेच्या प्रांगणात होती. मला भांडणे झाल्याचा आवाज आला. आमच्याकडील कर्मचारी मुनावर यांचे भांडणे चालू होती. मी जावून पाहिले असता वारीस व मुनावर यांचे भांडण चालू होते. सर्व कर्मचारी यांनी ते भांडणे सोडवण्याचा प्रयत्न करत होते. त्या हेड मास्तर राजा पटेल अब्दूल बाकी हे तिथे होते. इरशाद कादरी पण तिथे होते. माझे पती तिथे बस चालक म्हणून तिथे काम करतात. भांडण वाढल्यामुळे ते तिथे गेले. माझे पती पगार घेण्यासाठी हेड मास्तरकडे गेले होते. त्यामूळे माझे पती पण भांडणे सोडवायला गेले. त्यानंतर आरोपी हा मुनावरला सोडून माझ्या पतीला मारु लागला. त्यांने त्याला काठीने मारले. त्यांच्या डाव्या पायावर व पोटात लागले. मी व इतर कर्मचारी यांनी त्यांना सोडविले. त्यांनतर माझ्या पतीला जास्त मार लागल्याने हॉस्पीटला गेलो. आम्ही आदी पोलिसांना तक्रार द्यायला गेलो. आम्ही अगोदर हॉस्पीटलला गेलो नंतर पोलिस स्टेशनला गेलात. कार्टात असणारा आरोपी तोच आहे.

जी.एम.आर.क्र. ४५/२०२५ मधील बाबूंची काठी मला दाखविली. ती तीच आहे.

**( साक्षीदार क्र. ०१ चा उलटतपास आरोपी तर्फे श्रीमती ए.आर.शेख विधीज्ञ यांनी तहकुबीसाठी अर्ज दिल्याने पुढील तारखेपर्यंत उलटतपास तहकुब करण्यात आला.)**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.07.16 15:58:53 +0530

**दिनांक – १६/०७/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र.व.**
**उदगीर** **(न्यायालय क्रं. १), उदगीर.**

**दाखला**

साक्षीदार यांची साक्ष हिंदी भाषेत घेण्यात आली. तिचा अनुवाद करुन मराठीत नोंदवून घेण्यात आली. साक्षीदार यांचा जबाब हिंदी सांगितला व तो मराठीत नोंदवून घेतला व तो त्यांच्या सांगण्याप्रमाणे असल्याचे हिंदीत अनुवादीत  करुन सांगण्यात आले. म्हणून सदर दाखला.

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.07.16 15:58:59 +0530

**दिनांक – १६/०७/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र.व.**
**उदगीर** **(न्यायालय क्रं. १), उदगीर.**